एप्रिल २००३

# उपविधी व सहकार कायदा वाचून, समजून व त्यासाठी आग्रही असणे आवश्यक आहे.

प्रामुख्याने राज्य बँक, जिल्हा बँका, नागरी बँका व पतसंस्था यामध्ये काम करणारे पदाधिकारी, संचालक व वरीष्ठ अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ व संस्थेचा स्वत:चा उपविधी वाचून, समजून घेणे हे अत्यंत आवश्यक व अनिवार्य आहे. हे न वाचल्यामुळे व केव्हा केव्हा समजून न घेतल्यामुळे अनेक वेळा अनेकांना फार मोठ्या संकटांना सामोरे जावे लागते. संस्थेचा उपविधी न वाचता व समजून न घेता त्या संस्थेमध्ये कुठल्याही पदावर काम करणे हे त्या पदावर अन्याय नव्हे तर एक दिवस ही संस्था अडचणीत येण्याची लक्षणे दिसायला सुरूवात होते. हे टाळण्यासाठी संबंधित प्रत्येकाने संस्थेचा उपविधी प्रथम वाचलाच पाहिजे. व तो समजून घेतला पाहिजे व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आग्रही असणे ही आपली केवळ नैतिक जबाबदारी नसून कायदेशीर जबाबदारी आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

संस्थेचा उपविधी एकदा समजून घेतला तर महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० वाचण्याची व समजून घेण्याची इच्छा आपोआप तयार होते. व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी आग्रही राहण्याची भूमिका स्विकारता येते. अन्यथा एखादी दुसरी व्यक्ति हे काम करण्यास अग्रेसर ठरल्यामुळे त्याचेवर ती जबाबदारी येते व इतर संबंधित आपल्या कर्तव्यापासून दूर जातात. आणि ही बाब संस्थेच्या हिताची दिर्घकालीन राहू शकत नाही.

प्रत्येक कृतीला व महत्त्वाकांक्षेला मर्यादा आहेत. हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. आणि हे जर आपण दुर्लक्षीत केले तर सहकार कायद्याने न केलेल्या गोष्टीची जबाबदारी सर्वांवर येते, हे समजून घेतले पाहिजे. व अशा गोष्टीचा फायदा व गैरफायदा संबंधित संस्थांना, पदाधिकारी संचालकांवर मोठे यक्षप्रश्न उभे करीत असतात. व त्यातून सोडवणूक होणेसाठी ज्ञान हे अज्ञानात रूपांतर होते व त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

केवळ ह्याच कारणामुळे संस्था नोंदणीचे प्रकरण असो, सर्वसाधारण सभा घेण्यासंदर्भात असो, सभासदत्व देणे, कर्ज अर्ज मंजुर करणे, त्याचे वितरण करणे, कर्ज थकित झाल्यानंतर त्याची वसुली करणे या गोष्टी उपविधी व कायदा वाचून, समजून न घेतल्यामुळे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आग्रही न राहिल्यामुळे सहकारी संस्था नोंदणी अधिकारी, लेखापरिक्षक व शासकीय यंत्रणा आपल्या संबंधितांवर कारवाई केल्याशिवाय थांबू शकत नाही. हे अंतिम कटू सत्त्यातूनही मार्ग काढणे, पळवाटा शोधणे, ॲडजस्टमेंट करणे, प्रलंबित ठेवणे इत्यादी बाबी ह्या आणखी महाभयंकर ठरतात. व त्याचे दुष्परिणाम अंतिमदृष्टया संस्थेच्या आर्थिक व्यवहारावर होतात. व चांगले

कार्यकर्ते, शिक्षीत कार्यकर्ते न वाचता व समजून न घेता कारण नसताना व आवश्यकता नसताना संकट ओढावून घेतात. आणि नेमके हेच टाळले पाहिजे.

अलिकडचे उदाहरण घ्यायचे झाले तर, आदर्श उपविधी स्विकारण्याचा आदेश लेखापरिक्षणास द्यावयाची मार्कांची टक्केवारी हा त्यातीलच एक प्रकार आहे. अन्यथा उपविधीत सुधारणा, उपविधी दुरुस्ती यासाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठविलेल्या प्रस्तावासाठी पदाधिकारी व संचालक यांची होणारी पिळवणूक, छळवणूक हे न वाचण्याच्या व न समजून घेण्याच्या व सहकार कायदा वाचून आग्रही न राहण्याच्या प्रवृत्तीतून उभे राहीलेले स्वत:हून ओढून घेतलेले संकट आहे. आणि म्हणून उपविधी, सहकार कायदा वाचलाच पाहिजे, वाचल्यानंतर समजून घेतला पाहिजे आणि हे सर्व झाले तर आपल्या विरोधात कुठलिही यंत्रणा वरचढ होऊ शकत नाही व आपला गैरफायदा घेऊ शकत नाही. व लाचारीचा शेवट होऊ शकतो हे माहित करून घेणे आवश्यक आहे.

यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ लि., पुणे, त्यांची विभागीय मंडळे, जिल्हा सहकारी बोर्ड ही दालने शिक्षण-प्रशिक्षणासाठी उपलब्ध आहेत. व त्यांचे राज्यभर मोठ्या प्रमाणात गेल्या ८४ वर्षापासून चांगले नेटवर्क (जाळे) उभे आहे. त्याचा फायदा करून घेण्याचा आपला हक्क कोणीही सोडता कामा नये, हे समजून घेतले पाहिजे.

अंतिम सत्य कायम आहे. वाचणे, समजून घेणे व त्यासाठी आग्रही राहणे हे सर्वांच्या हिताचेच आहे. हे पुन्हा एकदा निदर्शनास आणून देत असताना संबंधित प्रत्येक पदाधिकारी, संचालक, वरीष्ठ अधिकारी यांनी प्रत्येकाने स्वत: जवळ संस्थेच्या उपविधीची प्रत व महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे इंग्रजी अथवा मराठी पुस्तक संग्रही ठेवणे आवश्यक आहे. याशिवाय ही आर्थिक देवाण-घेवाणाची सहकारातील केंद्रे सुरक्षीत राहू शकत नाही व त्यामुळे आपल्यावर अन्याय, जुलूम, गैरफायदा, भिती, कारवाई होण्याचे प्रकार थांबू शकत नाही. या सर्वांवर रामबाण उपाय म्हणजे उपविधी व सहकार कायदा वाचून, समजून व त्यासाठी आग्रही असणे आवश्यक आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**